सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र

संलग्न: सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडिया, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन

पत्रव्यवहाराचा पत्ता: ईशान अपार्टमेंट, कुंभार गल्ली, नालेगांव, अहमदनगर ४१४ ००१

ई मेल: cyclingassociationmaharashtra@gmail.com **मोबाईल क्र.** : ७३८ ५०८ १२७० ; ९४२ २३३ ६८०८

सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अंतर्गत नोंणी क्र: 694/16 & F/24689

- **अध्यक्ष** : ॲड विक्रम रोठे
- **सचिव** : प्रा. संजय साठे
- **संघटन सचिव** : प्रताप जाधव
- **खजिनदार** : भिकन अंबे

अत्यंत महत्वाचे तातडीच्या कार्यवाहीसाठी

दिनांक: ४ जुलै २०२२

पुणे ते बारामती दरम्यान राष्ट्रीय व राज्यस्तर पुरुष, महिला, मुले व मुलींसाठी सायकल स्पर्धांचे आयोजन

महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन तसेच पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्षनेते माननीय अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमीत्त **शनिवार दिनांक २३ जुलै २०२२** रोजी पुणे ते बारामती दरम्यान सायकल स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया व सायकलिंग असोसिएसन ऑफ महाराष्ट्रच्या मान्यतेने पुणे जिल्हा शिक्षण मंडळ व क्रीडा जागृती, पुणे ही स्पर्धा आयोजित करीत असून या स्पर्धेची सर्व तांत्रिक जबाबदारी क्रीडा जागृती या संस्थेकडे आहे.

या स्पर्धा पुढील आठ विविध गटात होतील:

अ.क्र.	गट	ठिकाण	स्पर्धेचा स्तर	अंतर	एकूण बक्षिसे रु.
१.	पुरुषांसाठी	पुणे ते बारामती.	राष्ट्रीयस्तर.	१२२ कि.मी.	२,१८,०००
२.	पुरुषांसाठी	पुणे ते बारामती.	राज्यस्तर.	१२२ कि.मी.	१,४८,५००
३.	पुरुषांसाठी **MTB Cycle**	सासवड ते बारामती.	राज्यस्तर.	८५ कि.मी.	६५,५००
४.	महिलांसाठी	माळेगांव ते बारामती.	राष्ट्रीस्तर.	१५ कि.मी.	४३,०००
४.१	शालेय मुली	माळेगांव ते बारामती. एमटीबी / हायब्रीड सायकल फक्त	जिल्हास्तर १४ ते १६ वर्ष	१५ कि.मी.	८,०००
५	शालेय मुली	माळेगांव ते बारामती. एमटीबी / हायब्रीड सायकल फक्त	जिल्हास्तर १६ ते १८ वर्ष	१५ कि.मी.	८,०००
५.१	शालेय मुले	माळेगांव ते बारामती. एमटीबी / हायब्रीड सायकल फक्त	जिल्हास्तर १४ ते १६ वर्ष	१५ कि.मी.	८,०००
६.	शालेय मुले	माळेगांव ते बारामती. एमटीबी / हायब्रीड सायकल फक्त	जिल्हास्तर १६ ते १८ वर्ष	१५ कि.मी.	८,०००
				एकूण	५,०७,०००

अत्यंत महत्वाचे तातडीच्या कार्यवाहीसाठी

दिनांक: ४ जुलै २०२२

१) पुणे ते बारामती पुरुषांसाठी राष्ट्रीयस्तर व राज्यस्तर स्पर्धा दोन टप्प्यात पार पडेल (१) पुणे ते सासवड (२) सासवड ते बारामती.

i) सासवडला पहिल्या १० मिनीटांत येणारे सायकलपटूं दुस-या टप्प्यासाठी पात्र असतील अशा सर्व सायकलपट्टूंना एकत्रितणे सासवड ते बारामती या टप्प्यासाठी सोडण्यात येईल.

ii) दोनही टप्प्यांची एकत्रित वेळ काढून कमी वेळेतील सायकलपट्टू पुणे ते बारामती स्पर्धेचा विजेता घोषित करण्यात येईल.

iii) पुण्याबाहेरील सर्व स्पर्धकांची दिनांक २२ व २३ जुलै २०२२ रोजीची निवास व भोजन व्यवस्था करण्यात आली आहे.

२) पुरुषांसाठी **MTB Cycle** स्पर्धा :- सासवड ते बारामती पुरुषांसाठी ही स्पर्धा एमटीबी सायकल (**MTB Cycle**) साठी आहे. हायब्रीड सायकल या स्पर्धेसाठी चालतील. (नॅरो / रोडसायकलचे टायर चालणार नाहीत) या स्पर्धेसाठी नांव नोंदविलेल्या खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था सासवड येथे करण्यात आली आहे. मात्र निवास व भोजन व्यवस्था हवी असल्यास खेळाडुंनी नांव नोंदवताना तसे संयोजकांना सांगितले पाहिजे.

३) महिलांसाठी माळेगांव ते बारामती राष्ट्रीय सायकल स्पर्धा: महीलांसाठी राष्ट्रीयस्तर स्पर्धा माळेगांव ते बारामती या दरम्यान पार पडेल. स्पर्धेचे अंतर सुमारे १५ किमी आहे. बाहेरील खेळाडूंची निवास व भोजन व्यवस्था माळेगांव येथे करण्यात आली आहे.

४) जिल्हास्तर मुली व मुलांसाठी - या स्पर्धा १४ व १५ आणि १६ व १७ या वयोगटात होतील. या स्पर्धा एमटीबी MTB / हायब्रीड सायकलमध्ये होतील. रोड सायकल या स्पर्धेसाठी चालणार नाहीत. या स्पर्धेसाठी प्रवेशीका शाळांच्यामार्फत मा. प्राचार्य किंवा मा. क्रीडाशिक्षक यांच्या सहीने द्याव्यात.

५) या आठही गटाच्या स्पर्धेतील विजेत्यांना एकूण रुपये ५,००,००० ची रोख व भेट वस्तू स्वरुपात बक्षीसे देण्यात येतील. विजेत्यांना चषक तसेच सर्व गटातील विजेत्या आणि सहभागी स्पर्धकांना प्रशस्तीपत्र देण्यात येतील.

- पुरुषांच्या गटातील पुणे बाहेरील स्पर्धकांनी निवास व्यवस्थेसाठी सौ. मिनाक्षी ठाकूर मोबाईल क्र. ९०४९२१८७३७ यांचेकडे संपर्क साधावा.
- चेस्ट क्रमांकासाठी (BIB No.) नांव नोंदणी केलेल्या सायकलपट्टूंस दिनांक १८ जुलै २०२२ रोजी व्हॉटस्अप द्वारे कळविण्यात येईल. चेस्ट क्रमांक (BIB No.) शुक्रवार दिनांक २२ जुलै रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत घेऊन जावेत.
- MTB सायकलच्या सासवड ते बारामती स्पर्धे साठी श्री. धरमेंदर लांबा मो. क्र. ९०२८६ ५२३०६ / ८८३१० ४६४२१ यांचेकडे संपर्क साधावा.
- महिलांच्या माळेगांव ते बारामती स्पर्धेच्या माहितीसाठी श्री. तुषार निंबाळकर यांचेशी मोबाईल क्रमांक ९५६१९६९६१७ यांचेकडे संपर्क साधावा.

अत्यंत महत्वाचे तातडीच्या कार्यवाहीसाठी

दिनांक: ४ जुलै २०२२

६) बक्षिसाच्या रकमेचे चेक स्पर्धकांना ३० दिवसांत देण्यात येतील किंवा विजेत्यांनी त्यांच्या बँक खात्याची माहिती दिल्यास बक्षिसाची रक्कम त्यांच्या खात्यामध्ये ३० दिवसांत जमा करण्यात येईल.

७) इच्छूक सायकलपट्टूंनी आपले पूर्ण नाव, जन्मतारीख, आपला ई मेल, मोबाईल क्रमांक, कोणत्या गटात सहभागी व्हायचे आहे तो गट या सर्व माहितीसह सोबतचा इंट्री फॉर्म भरुन पुढील ई मेलवर cyclingassociationmaharashtra@gmail.com किंवा kreedajagruti@gmail.com किंवा मोबाईल क्र. ७३८५० ८१२७० / ९४२२३ ३६८०८ वर व्हाटस् अप द्वारे पाठवावी किंवा सोबतच्या लिंकद्वारे पाठवावा, अशा सायकपटूंचे नांव नोंदवण्यात येईल आणि त्यांना पुढील माहिती व सूचना उपलब्ध करुन देण्यात येतील.

प्रवेशिका दिनांक १८ जुलै २०२२ पर्यंत स्वीकारण्यात येतील.

कळावे, धन्यवाद !!

आपले विनीत

प्रताप जाधव
संघटन सचिव
स्पर्धा संचालक
खजिनदार, सायकलिंग फेडरेषन ऑफ इंडिया
मोबाईल : ९४२ २३३ ६८०८ / ९३० ९५५ ५०३०

प्रा. संजय साठे
मानद सचिव

Cycling Association of Maharashtra

निरोगी राहण्याचा एकच मंत्र; सायकल चालविण्याचे अवगत करा तंत्र